नि. फौ.खटल क्र. ५८/२०२६
सहयाद्री स्टार्च इंडस्ट्रीज प्रा. लि. वि.
विलाराव प्रकाश मेघे
निशाणी १ खाली

**फिर्यादी तर्फे साक्षीदार क्र. ०१ यांची जबानी**

मी शपथेवर कथन करतो की,

| | | |
|---|---|---|
| माझे नांव | : | विश्वास कोंडीबा पाटील |
| वय | : | ४५ वर्षे |
| धंदा | : | मॅनेजर |
| राहणार | : | वारणाली, ता. मिरज . |

---

**फिर्यादी तर्फे साक्षीदार यांचा बी.एन.एस.एस. २२३ प्रमाणे पडताळणी**

१. विलास मुधे आणी शंकर जानकर हे दोघे १५–२० वर्षापुर्वी दत्तात्रय पाटोळे यांच्याकडे कंट्राटी पध्दतीने कामाला होते. त्यांच्याकडे राजीनामा देवून ते सोडून गेले होते. सन २०२५ मध्ये हरीदास लेंगरे याची माथाडी कामगाराच्या संघटनेत जावून आरोपीने खोटे शपथपत्र माथाडी बोर्ड येथे दाखल केले. त्यानंतर २० – २५ कामगार कंपनीच्या गेटवर येवून दंगा करीत होते. त्या नुसार मी एमआयडीसी कुपवाड पोलीस ठाणे येथे तक्रार दाखल केली. त्यांच्यावर माथाडी बोर्डाकडून अजुनही कोणत्याही प्रकरची कारवाई झाली नाही. आरोपीने दाखल कलेले शपथपत्र हे चुकीचे आणी खोटे आहे. त्यामुळे प्रस्तुत तक्रार दाखल केली.

30/3/2026